# ‘कॉमर्स’ची एनएसएसची ट्रेकिंग मोहीम

## स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग : निमशिरगावच्या तुकाई टेकडीमार्गे कुंभोजपर्यंत भ्रंमती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

येथील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) स्वयंसेवकांनी रविवारी (दि. ४ नोव्हेंबर) निमशिरगाव येथील तुकाई टेकडीमार्गे कुंभोज अशी १३ किलोमीटरची ट्रेकिंग मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. ट्रेकिंगमध्ये मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त होती. या मोहिमेतर्गत विद्यार्थ्यांनी तुकाई मंदिर, बाबू जमाल दर्गा या ठिकाणी भेटी दिल्या. प्रा. नंदकुमार कुंभार यांनी तुकाई मंदिराचा इतिहास, आख्यायिका, याविषयीची माहिती सहभागी स्वयंसेवकांना दिली. कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम (वय ७५), डॉ. अशोक बन्ने, अमित पाटील, प्रा. शांताराम कांबळे, आनंदा पाटील आदींनी ट्रेकिंगमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



**कोल्हापूर : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्साहात ट्रेकिंग मोहीम यशस्वी केली.**

तरुण भारत
9-11-23